देगलूर : देगलूर महाविद्यालयात ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

# देगलूर महाविद्यालयात ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा

देगलूर : 'आझादी का अमृत महोत्सव'निमित्त देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्यावतीने प्राचार्य डॉ. ए. बी. चिद्रावार यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. 'भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने व उपाय' या विषयावर गुगल मिटच्या लिंकद्वारे स्पर्धा आयोजित केली होती. प्रस्तुत स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र प्रमुख बी.आर. कतुरवार, डॉ. एस.एम. देवडे व प्रा. ज्ञानेश्वर कोकणे यांनी परिश्रम घेतले.